# रेग्युलर कब्जा क्रमांक १६४/२०२३

विमल गौतम वाघमारे
**विरुध्द**
बाळु आनंदा कांबळे

## निशाणी ३४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला निशाणी क्र.१ वरील पुरावा नाही चा आदेश रद्द होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे काम हे पुराव्यावरती नेमणेत आलेले आहे. सदर कामी वादी यांनी वेळेत पुरावा दाखल न केलेने त्यांचेविरुध्द दि. १७.११.२०२५ रोजी पुरावा नाहीचा आदेश झालेला आहे. वादी या महिला असून त्या वयोवृध्द असलेने व कायद्याचे ज्ञान नसलेने त्यांना वेळेत वकिलांची भेट घेवून सदर कामी पुरावा देता आला नाही. वादीने कोणत्याही प्रकारे दिरंगाई केलेली नाही अगर पुरावा देण्यास टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे वादी यांचा पुरावा दाखल करणेस न्यायाच्या हेतुस्तव आवश्यक व गरजेचे आहे त्यामुळे वादी यांचेविरुध्द ' पुरावा नाही ' असा झालेला आदेश रद्द होवून मिळणेविषयी त्यांनी विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व असे कथन केले की, अर्ज व त्यातील नमुद कारण खरी व प्रामाणीकपणाची नाहीत. वादींना पुरावा देणेसाठी पुरेशी संधी देवून देखील त्यांनी या कामी जाणीवपुर्वक पुरावा वेळेत दिलेला नाही. अर्ज मंजूर होणेसाठी कोणतेही संयुक्तीक कारणे नमुद नाहीत. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा. तसेच अर्ज मंजूर करावयाचा झालेस हेवी कॉस्ट वादी यांना करणेत यावी.

४. प्रस्तुत अर्ज व म्हणणेचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला निशाणी क्र.१ वरील ' पुरावा नाही ' चा आदेश रद्द होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. वादी या वयोवृध्द असलेने व कायद्याचे ज्ञान नसलेने त्यांना वेळेत वकिलांची भेट घेवून सदर कामी पुरावा देता आला नाही व त्यांना वेळेत पुरावा दाखल करता आला नाही त्यामुळे " त्यांचा पुरावा नाही" असा आदेश पारीत करणेत आलेला आहे परंतू वादी यांनी कोणत्याही प्रकारे पुरावा दाखल करण्यास टाळाटाळ केली नाही. त्यामुळे वादी यांना एक संधी देण्यात यावी व त्यांचेविरुध्द झालेला पुरावा

नाही चा आदेश रद्द होणेकामी वादी यांनी विनंती केली. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांची हरकत मांडली. परंतू वादी यांनी सदरचा दावा हा वाटपाकरिता व कायम मनाई होवून मिळणेकरिता दाखल केला असल्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल लागणेकरिता वादी यांनी या दाव्याकामी त्यांचा पुरावा दाखल करणे हे आवश्यक आहे व वादी यांना नैसर्गिक न्यायदानाच्या तत्वानुसार त्यांचा पुरावा दाखल करणेकरिता योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. वादी यांना त्यांचा पुरावा दाखल करण्यास संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्याकरिता वादी यांच्या विरुध्द झालेला निशाणी क्र.१ वरील पुरावा नाही चा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादीला झालेल्या तसदीकडे दुर्लक्ष करता येणार नाही परंतू प्रतिवादीला काही अंशी कॉस्ट दिल्यास त्यांचेवर पक्षपात होणार नाही. सबब त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आ दे श

अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/-(रुपये पाचशे फक्त ) इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.02.10 12:59:13 +0530

दिनांक -०९.०२.२०२६.
ठिकाण - पन्हाळा

एस.व्ही.जंगमस्वामी,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पन्हाळा.